# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८१ वी बैठक दिनांक २१ नोव्हेंबर २०१३

### ठराव

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ८१ वी बैठक दि. २१ नोव्हेंबर २०१३ रोजी दालन क्र. ७१२ विधानभवन, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. शशिकांत शिंदे | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. इंजि.ए.बा.पाटील | ... | प्रधान सचिव (जप्र व वि) व सदस्य |
| ३. | इंजि. शि.मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. नं. वि. पाटील | ... | अवर सचिव<br>(प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी) |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. च.आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| २. | श्री. अजित मोरे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महामंडळ) |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ८१ वी बैठक दिनांक २१ नोव्हेंबर २०१३

### ठराव

ठराव क्रमांक ८१/१ :

"नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही"

ठराव क्रमांक ८१/२ :

"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ८० व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत".

ठराव क्रमांक ८१/३ :

"ठराव करण्यांत येतो की, टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत कवठेमहांकाळ कालव्याच्या **लाभक्षेत्रात ढालगांव, ता. कवठेमहांकाळ परिसरातील (१) ढालगांव (२) शिंदेवाडी, (३) कदमवाडी (४) ढोलेवाडी (५) चोरोची (६) जांभूळवाडी (७) चुडेखिंड (८) दुधेबावी या ८ गावांच्या अंतर्भाव करण्याच्या प्रस्तावास शासनाचे संदर्भ पत्र क्र. टेंभू ०७१३ / (४७५/१३) /** मोप्र-१ दि. २४-१०-२०१३ नुसार तत्वत: मान्यता प्राप्त असून सदर प्रस्तावाचे नियामक मंडळाद्वारे अवलोकन करुन कवठे महांकाळ कालव्याच्या वितरण व्यवस्थेबरोबर या भागातील कामे सलगतेने हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे".

ठराव क्रमांक ८१/४

"ठराव करण्यांत येतो की, सावर्दे लघु पाटबंधारे तलाव ता.राधानगरी या प्रकल्पास आवश्यक असलेले १४.१२ हेक्टर वनक्षेत्र (वन्यजीव) संपादनातील अडचणी विचारात घेता सदर प्रकल्प रद्द करुन त्या ऐवजी तेवढयाच क्षमतेचा नविन प्रकल्प हाती घेण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८१ वी बैठक दिनांक २१ नोव्हेंबर २०१३

**ठराव क्रमांक ८१/५**

"नियामक मंडळाच्या बैठकीत सदर विषयावर चर्चा होऊन सुधारित प्रशासकीय मान्यता अभावी जो निधी अखर्चित रहाणार आहे तो निधी कोणत्या प्रकल्पासाठी वापरणे प्रस्तावीत आहे. तसेच अशा कार्यवाहीमुळे पाणीसाठा/सिंचन क्षमता निर्मितीमध्ये काय वाढ अपेक्षीत आहे या सर्व सवीस्तर तपशीलासह प्रस्ताव पुन्हा नियामक मंडळात ठेवण्याबाबत सुचीत केल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.

ठराव क्रमांक ८१/६

"ठराव करण्यांत येतो की, राष्ट्रीय अजैविक स्ट्रेस प्रबंधक संस्था यांनी माळेगाव खुर्द, ता.बारामती, जि.पुणे हद्दीतील नीरा डावा कालवा कि.मी.६१ ते ६३ मधील ७०५ चौ.मी.संपादित विनावापर मोकळी जागा संस्थेस मंजूर केलेल्या उचल पाणी परवाना योजना कार्यान्वीत करण्यासाठी पंप हाऊस व पंपवेलसाठी संस्थेस मिळावी अशी मागणी केली आहे. अर्जदार संस्था भारत सरकार कृषी मंत्रालय अंतर्गतची (ICAR) शेती संशोधन संस्था आहे. संस्थेने मागणी केलेल्या संपादित जागेचा वापर संस्था जमिनीतील पाणी पातळी अभ्यास संशोधनासाठी करणार आहे. संस्थेने मागणी केलेली जागा सद्य:स्थितीत व भविष्यात विभागास आवश्यक नाही. त्यामुळे भारत सरकार कृषी मंत्रालय अंतर्गतच्या या संस्थेस महामंडळाचे प्रचलित भाडेपट्टयाचे दरानुसार तसेच आवश्यकता असल्यास ५ वर्षाने नुतनीकरण करण्याचे अटीवर व प्रती वर्षी १० % भाडे वाढ करण्याचे अटीवर भाडेपट्टयाने देण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

"मान्य"

(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे